**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७१३/२०२२**
**सरकार विरुध्द सुनील खिराडी चव्हाण**
निशाणी क्र. १० लगत

## <u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ याची शपथेवर साक्ष</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक शपथेवर निवेदन करतो की,
माझे नाव: – सचिन भानूदास वानखडे,
वय: – ४३ वर्षे, धंदा - शेती,
राहणार: – एंडली आमला, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

## <u>सरतपास अभियोग पक्षाकरीता सहा.सरकारी अभियोक्ता श्री. जी. बी. पाटील यांच्यामार्फत -</u>

०१. आरोपीस मी ओळखतो. तो माझ्याकडे शेतीच्या कामासाठी येतो. दिनांक ०८.०४.२०२० रोजी दर्यापूर पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी कुठेही बोलाविले नव्हते. त्यांनी माझ्यासमक्ष काहीही कारवाई केली नाही. मी गावात असताना त्यांनी पंचनाम्यावर माझी सही घेतली होती. पंचनामा आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर मला माहिती नाही. पंचनाम्यावरील पंचाच्या सहीला **<u>निशाणी क्र. १३</u>** देण्यात येतो. पोलीसांनी माझे बयान नोंदविले नव्हते.

**साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन करीत नसल्याने वि.सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी त्याला उलट तपासणीच्या स्वरुपातील प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी दर्यापूर पोलीसांनी मला एंडली आमला येथे आरोपीच्या घरी घटनास्थळ/ जप्ती पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलीसांनी आरोपीच्या घराची झडती घेतली असता घराच्या आवारातील पराटीच्या खाली तीन प्लास्टीक ड्रम मिळून आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यापैकी दोन ड्रममध्ये प्रत्येकी २० लीटर हातभट्टीची गावठी दारू आणि तिसऱ्या ड्रममध्ये ५० लीटर मोहा सडवा मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी हा सर्व मुद्देमाल जप्त करून त्याचा माझ्यासमक्ष पंचनामा केला, तो मला वाचून दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलीसांनी जप्त

मुद्देमालापैकी एका काचेच्या बाटलीत जप्त दारू आणि दुसऱ्या काचेच्या बाटलीत मोहा सडवा रासायनिक तपासणी कामी माझ्यासमक्ष वेगळे काढून त्यावर पंचांच्या सह्यांचे सिल लावले. हे म्हणणे खरे नाही की, तिथे पोलीसांनी उर्वरीत मुद्देमाल जागीच नाश केला. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०४.२०२० रोजी पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. आता मला बयानातील रेखांकीत भाग 'अ' वाचून दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. परंतू तो त्यात का आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एन. प्रभे यांच्यामार्फत-**

उलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृत,

SAMEER DILIP KAMALAKAR

Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2026.06.24 15:23:47 +0530

(स. दि. कमलाकर)

दिनांक- २६.०६.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
दर्यापूर.